-५८९

महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक--२०१७
निवडणूक निर्णय अधिकारी, सहायक निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या नियुक्त्या करण्याबाबत...

# राज्य निवडणूक आयोग,महाराष्ट्र

क्रमांक: रानिआ/मनपा-२०११/प्र.क्र. १६/का-५,
नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालयासमोर,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई- ४०० ०३२.
दिनांक : २६/१२/२०१६.

वाचा:- राज्य निवडणूक आयोगाचे आदेश क्रमांक-रानिआ/मनपा-२०११/प्र.क्र.१६/का-५, दिनांक- १२/३/२०१५.

ज्याअर्थी, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३ के व २४३ झेडए अन्वये राज्यातील पंचायती व नगरपालिका यांच्या निवडणुकांचे अधिक्षण, संचालन व नियंत्रण याची सर्व जबाबदारी राज्य निवडणूक आयोगाची आहे.

आणि ज्याअर्थी, राज्य निवडणूक आयोगाच्या समक्रमांकाच्या दिनांक १२/३/२०१५ च्या आदेशान्वये महानगरपालिकेच्या निवडणुकांसाठी निवडणूक निर्णय अधिकारी, सहायक निवडणूक निर्णय अधिकारी इत्यादी अधिकाऱ्यांच्या नियुक्त्या व इतर बाबींसाठी तरतूद करण्यात आलेली आहे. या आदेशानुसार बृहन्मुंबई महानगरपालिकेकरिता साधारणत: १० प्रभागांकरिता एक याप्रमाणे निवडणूक निर्णय अधिकारी नेमावयाचे असून, इतर महानगरपालिकांमध्ये प्रत्येकी १० ते १२ प्रभागांकरिता एक याप्रमाणे निवडणूक निर्णय अधिकारी नेमावयाचे आहेत.

आणि ज्याअर्थी, शासनाने दिनांक ३० ऑगस्ट, २०१६ रोजी काढलेल्या अध्यादेशानुसार महानगरपालिका निवडणुकांकरिता (बृहन्मुंबई वगळून) एकसदस्यीय प्रभाग पध्दती रद्द करून बहुसदस्यीय प्रभाग पध्दती लागू केलेली आहे. आणि त्यानुसार प्रत्येक प्रभागातून शक्य असेल तेथवर ४ पालिका सदस्य, परंतु ३ पेक्षा कमी नाहीत व ५ पेक्षा अधिक नाहीत यानुसार निवडून द्यावयाचे आहेत.

आणि ज्याअर्थी, बृहन्मुंबई वगळता इतर महानगरपालिकांच्या निवडणुकांकरिता लागू केलेल्या बहुसदस्यीय प्रभाग पध्दतीस अनुसरुन इतर महानगरपालिकांमध्ये किती प्रभागांसाठी एक निवडणूक निर्णय अधिकारी नेमावयाचा याबाबत सुधारित आदेश काढणे आवश्यक आहे. तसेच सोइच्या दृष्टीने बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणूकीकरीता प्रत्येक निवडणूक निर्णय अधिकारी यांना नेमून द्यावयाच्या प्रभागांच्या संख्येतही सुधारणा करणे आवश्यक आहे.

त्याअर्थी, भारतीय संविधान व संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थांच्या अधिनियमातील तरतुदींन्वये दिनांक १२/३/२०१५ च्या आदेशामध्ये खालीलप्रमाणे अंशत: सुधारणा करण्यात येत आहे :-

(i) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीकरिता १० ते १२ प्रभागांसाठी एक याप्रमाणे निवडणूक निर्णय अधिकारी असतील.

(ii) इतर महानगरपालिकांमध्ये (बृहन्मुंबई वगळून) एकसदस्यीय पध्दतीऐवजी बहुसदस्यीय पध्दती लागू असल्यामुळे सार्वत्रिक निवडणुकीकरिता, शक्यतो ३ व अपवादात्मक परिस्थितीत ४ प्रभागांकरिता १ याप्रमाणे निवडणूक निर्णय अधिकारी राहतील.

(iii) महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुकांकरिता निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून उप जिल्हाधिकारी संवर्गातील अधिकारी नेमण्यात यावेत. मात्र जर उप जिल्हाधिकारी संवर्गातील अधिकारी पुरेशा प्रमाणात उपलब्ध नसतील तर अन्य महानगरपालिकेतील उपायुक्तांना, निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून नेमता येईल.

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

( नि. ज. वागळे )
अवर सचिव,
राज्य निवडणूक आयोग

प्रति,
१. सर्व महानगरपालिका आयुक्त,
२. सर्व विभागीय आयुक्त
३. सर्व जिल्हाधिकारी
४. राज्य निवडणूक आयोगातील सर्व अधिकारी/सर्व कार्यासने
५. मा. राज्य निवडणूक आयुक्त यांचे स्वीय सहायक
६. सचिव, राज्य निवडणूक आयोग यांचे स्वीय सहायक
७. निवड नस्ती.